**MHNB100013232022**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २२५/२०२२**
**राजकुमार रामकरण यादव –विरुद्ध– महाराष्ट्र शासन**
**मधील निशाणी क्र. ०१ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज पोलिस ठाणे, अक्कलकुवा येथे नोंदविण्यात आलेल्या भारतीय दंड संहिता कलम १८८, २७२, २७३, ३२८ आणि अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ कलम ३०(२)(अ), २६(२)(i), २७(३)(ई), २६(२)(iv), ५९ इत्यादी अन्वये शिक्षेस पात्र अपराध क्र. ४२३/२०२२ मध्ये जप्त करण्यात आलेली एम.एच.–४०/एन.–२७२७ क्रमांकाचा टाटा मोटर्स लिमिटेड कंपनीचा ट्रकचा ताबा मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत गुन्ह्यात अद्यापपावेतो दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही.

**०२)** सरकारी वकिलांच्या व तपासी अधिकाऱ्याचे म्हणण्याचे अवलोकन केले. तपासी अधिकाऱ्याचे म्हणणे निशाणी क्र. ६ वर आहे. सरकारी वकिलांनी अर्जदार सदर गुन्ह्याचा तपास प्रगतीपथावर असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली, तर तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्याबाबत त्यांची हरकत नसल्याचे सादर केले आहे.

**०३)** अर्जदाराचे विधीज्ञ श्री आर.आर.मराठे आणि विशेष सरकारी अभियोक्ता श्री एम. आय. मन्सुरी यांचे युक्तिवाद ऐकले. गुन्ह्यांशी संबंधित कागदपत्राचे अवलोकन केले. अभिलेखावर दाखल वाहनाचे दस्तऐवज आणि वाहनाच्या विम्याच्या दस्तऐवजांवरुन अर्जदार हा सदर वाहनाचा मालक असल्याचे दिसते. सदर वाहन सद्यःस्थितीत पोलिस ठाणे, अक्कलकुवा यांच्या कार्यालयात पडून आहे. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास सदर वाहनाची उपयुक्तता संपुष्ठात येऊ शकते.

**०४)** उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत गुन्हयातील वाहन आरोपीकडून जप्त करण्यात आले आहे तसेच सदर अर्जदाराने मालकीबाबत दस्तऐवज सादर केलेली असल्यामुळे सदर वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे न्यायोचित राहिल असे माझे बनते. तसेच अर्जदार हा परजिल्ह्यातील रहिवासी असल्यामुळे त्याच्याकडून काही अनामत रक्कम भरुन सदर वाहनाचा अंतरिम ताबा काही अटी व शर्तीवर अर्जदारास देणे न्यायोचित राहील असेही माझे मत बनते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतात

## आ दे श

१} प्रस्तुतचा अर्ज खालील अटीं व शर्तींवर मंजूर करण्यात येतो.

२} **अ.** पोलिस ठाणे, अक्कलकुवा येथील अपराध क्र. ४२३/२०२२ मधील जप्त करण्यात आलेली एम.एच.–४०/एन.–२७२७ क्रमांकाचा टाटा मोटर्स लिमिटेड कंपनीचा ट्रक, चेचीस नं. MAT457403B7F28986, इंजिन नं. 497TC92FYY835905 चा ताबा अर्जदार श्री राजकुमार रामकरण यादव, रा. प्लॉट नं. टी–१३, वसंत विहार कॉलनी, खडगाव रोड, वाडी, नागपुर ता.जि.नागपुर याच्या ताब्यात रुपये १३,००,०००/– ( तेरा लाख रुपये मात्र) चे सुपूर्तनाम्यावर देण्यात यावा.

**ब.** अर्जदाराने रक्कम रुपये ५,०००/– (पाच हजार रुपये मात्र) अनामत म्हणून न्यायालयात भरणा करावी.

**क.** सदर वाहनाच्या स्वरुपामध्ये कोणत्याही प्रकारे फेरबदल/मोडतोड करणार नाही अथवा सदर वाहन अन्य कोणालाही हस्तांतरीत करणार नाही असे वचनपत्र अर्जदाराने सादर करावे.

**ड.** अजदाराने सदर वाहनाच्या सर्व कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती तपासी अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात.

**इ.** तपासी अधिकाऱ्याने अथवा न्यायालयाने आदेशित केल्यास हजर राहण्याचे व तपासकामी अथवा खटल्याच्या सुनावणीदरम्यान मदत करेन असे वचनपत्र देखील अर्जदाराने सादर करावे.

३} तपासी अधिकाऱ्यास आदेशित करण्यात येते की,

**अ.** सदर वाहनाची चारही बाजूंनी छायाचित्रे काढून त्यावर अर्जदाराच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

**ब.** सदर वाहन अर्जदारास परत केल्याबाबत योग्य तो पंचनामा तयार करावा.

**क.** सुपूर्तनामा, वाहन अर्जदारास परत केल्याचा पंचनामा आणि वाहनाची छायाचित्रे हे सर्व दस्तऐवज दोषारोपपत्रासोबत दाखल करावेत.

४} प्रस्तुत आदेशाबाबत तपासी अधिकाऱ्यास कळविण्यात यावे.

५} प्रकरण दाखल दप्तर करण्यात येते.

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2022.11.17 16:15:12 +0530

( **विश्वास पां. शिंदे** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा
जिल्हा नंदूरबार.

ठिकाण :– अक्कलकुवा
दिनांक :– १७/११/२०२२

## <u>दा ख ला</u>

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :- | मयुर धर्मराज पाटील |
| न्यायालयाचे नाव | :- | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| आदेश जाहीर केल्याची तारीख | :- | १७/११/२०२२ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :- | १७/११/२०२२ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :- | १७/११/२०२२ |